सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ४ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाकुंभामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्रिवेणी संगमात केले पवित्र स्नान, वेशभूषेने वेधून घेतलं लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५प्रयागराज**

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यामध्ये आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित राहत त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार प्रयागराज येथे आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्नानावेळची वेशभूषाही वैशिष्ट्यपूर्ण आणि लक्षवेधी होती.

आज सकाळी दिल्लीहून विमानाने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रयागराज येथे



पोहोचले. नियमितपणे कुर्ता पायजमा आणि जॅकेट परिधान करणारे नरेंद्र मोदी मोदी हे महाकुंभमेळ्यामध्ये थोड्या वेगळ्याच रूपात दिसले. यावेळी नरेंद्र मोदींसोबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हेही उपस्थित होते. नरेंद्र मोदी हे निषादराज क्रूजमधून संगमाजवळ पोहोचले. तिथे गळ्यात केसरी उपरणं आणि हातात रुद्राक्षांच्या माळा परिधान करून त्यांनी त्रिवेणी संगमान स्नान केलं. यावेळी महाकुंभानिमित्त संगमतटावर आलेल्या लाखो भाविकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक झलक पाहण्यासाठी उत्सुकता दिसून येत होती.

यादरम्यान, सीआरपीएफ आणि लष्कराच्या जवानांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. १३ जानेवारीपासून प्रयागराज येथील त्रिवेणी संगमाजवळ सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यामध्ये आतापर्यंत ३९ कोटीहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आधी गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं आहे.

## दिल्लीत ३ वाजेपर्यंत ४६.५५% मतदान
## सीलमपूरमध्ये आप-भाजप समर्थक भिडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी दुपारी १ वाजेपर्यंत ३३.३१% मतदान झाले आहे. ईशान्य दिल्लीत सर्वाधिक ३९.५१% मतदान झाले. हा भाजप खासदार मनोज तिवारी यांचा संसदीय मतदारसंघ आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराज्यपाल व्हीके सक्सेना, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, मुख्यमंत्री आतिशी आणि राहुल गांधी यांनी मतदान केले आहे. याशिवाय प्रियांका गांधी यांनी त्यांच्या आई सोनिया, पती आणि मुलासह मतदान केले. अरविंद केजरीवाल त्यांच्या पालकांना व्हीलचेअरवर घेऊन मतदान करण्यासाठी आले.सीलमपूरमध्ये बुरखा परिधान केलेल्या महिलांना बनावट मतदान करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप भाजपने केला आहे. यावेळी आप आणि भाजप समर्थकांमध्ये हाणामारी झाली. त्यामुळे गोंधळ सुरू झाला. बीएलओने कबूल केले की इतर लोकांनी दुसऱ्याच्या नावाने मतदान केले



होते.यानंतर पोलिस येथे तपास करत आहेत. आपचे खासदार संजय सिंह म्हणाले की, नॉर्थ अव्हेन्यू एन ब्लॉकमध्ये २०००-३००० रुपये वाटण्यात आले आणि लोकांच्या बोटांवर शाई लावण्यात आली. हे सर्व निवडणूक आयोगाच्या नाकाखाली घडत आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी दुपारी १ वाजेपर्यंत ३३.३१% मतदान झाले आहे. ईशान्य दिल्लीत सर्वाधिक ३९.५१% मतदान झाले. हा भाजप खासदार मनोज तिवारी यांचा संसदीय मतदारसंघ आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराज्यपाल व्हीके सक्सेना, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, मुख्यमंत्री आतिशी आणि राहुल गांधी यांनी मतदान केले आहे. याशिवाय प्रियांका गांधी यांनी त्यांच्या आई सोनिया, पती आणि मुलासह मतदान केले. अरविंद केजरीवाल त्यांच्या पालकांना व्हीलचेअरवर घेऊन मतदान करण्यासाठी आले.

सीलमपूरमध्ये बुरखा परिधान केलेल्या महिलांना बनावट मतदान करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप भाजपने केला आहे. यावेळी आप आणि भाजप समर्थकांमध्ये हाणामारी झाली. त्यामुळे गोंधळ सुरू झाला. बीएलओने कबूल केले की इतर लोकांनी दुसऱ्याच्या नावाने मतदान केले होते.यानंतर पोलिस येथे तपास करत आहेत. आपचे खासदार संजय सिंह म्हणाले की, नॉर्थ अव्हेन्यू एन ब्लॉकमध्ये २०००-३००० रुपये वाटण्यात आले आणि लोकांच्या बोटांवर शाई लावण्यात आली. हे सर्व निवडणूक आयोगाच्या नाकाखाली घडत आहे.

## ट्रम्प सरकारची कारवाई; अमेरिकेतील अवैध भारतीय स्थलांतरितांना मायदेशात पाठवले
### अमेरिकेचे सैन्य विमान १०४ जणांच्या पहिल्या तुकडीसह अमृतसरमध्ये दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमृतसर**

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवैध स्थलांतरितांवर कारवाई सुरू केली आहे. यात अमेरिकेत राहणाऱ्या अवैध भारतीयांवरही कारवाई केली जात आहे. याचाच भाग म्हणून, अमेरिकेचे लष्करी विमान अवैध भारतीय स्थलांतरितांना घेऊन आज भारतात पोहोचले. १०४ अवैध भारतीय स्थलांतरितांची पहिली तुकडी अमेरिकेच्या C-147 विमानातून भारतात पोहोचली.

हे विमान अमृतसर



विमानतळावर उतरले. यावेळी पोलीस आणि प्रशासन तैनात होते. अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्यानुसार, विमानात एकूण १०४ भारतीय आहेत, ज्यात १३ मुले, ७९ पुरुष आणि २५ महिलांचा समावेश आहे. या भारतीयांपैकी गुजरात-३३, पंजाब-३०, यूपी-०३, हरियाणा-३३, चंडीगड-०२, महाराष्ट्र-०३ आहेत.

**डंकी मार्गाने अमेरिकेत प्रवेश**

मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिकेतून हद्दपार करण्यात आलेल्या भारतीयांना मेक्सिको-अमेरिका सीमेवर पकडण्यात आले होते. ते सर्वजण कायदेशीररित्या भारतातून निघाले होते, मात्र पुढे डंकी मार्गाने अमेरिकेत घुसण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. या लोकांना भारतात आल्यावर अटक करण्यात येणार नाही, कारण त्यांनी कोणत्याही प्रकारे भारतीय कायद्यांचे उल्लंघन केलेले नाही.

दरम्यान, २७ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या फोनवरील संभाषणानंतर ट्रम्प यांनी अमेरिकेतून अवैध स्थलांतरितांना भारतात परत आणण्यासाठी भारत योग्य पावले उचलेल, असे सांगितले होते. अंदाजानुसार, अमेरिकेत अंदाजे १८,००० अवैध स्थलांतरित आहेत, ज्यांना भारतात पाठवले जाणार आहे. ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर भारत सरकारने ही समस्या सोडवण्यासाठी प्यू रिसर्च सेंटरच्या आकडेवारीनुसार, अमेरिकेत सुमारे ७.२५ लाख अवैध भारतीय स्थलांतरित राहतात. बेकायदेशीर स्थलांतरितांची ही संख्या तिसरी सर्वात मोठी आहे.

## संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना खपवून घेणार नाही, कारवाई नक्की होणार
### देवेंद्र फडणवीसांनी बीडच्या जनतेला दिला विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५बीड**

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणातील सात आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे. तर एक आरोपी अद्याप फरार आहे. या प्रकरणानंतर बीडमधील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच आता राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. कोणीही असो प्रत्येकावर कारवाई होईल हा विश्वास देतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी बीडमधील जाहीर सभेत सांगितले.

शेतकऱ्यांना बारा महिने दिवसा वीज देण्यासाठी सरकार काम करत आहे. शेतकऱ्यांना आता बारा महिने वीजपुरवठा होणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने नवीन वीज कंपनी तयार केली



आहे. राज्यातील उपसा सिंचन योजना सोलावर टाकण्यात येत आहे. दरवर्षी आम्ही विजेचे भाव कमी करत जाणार असल्याचे देखील फडणवीस यांनी सांगितले.

५३ टीएमसी पाणी हे जायकवाडी धरणामध्ये येणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मराठवाडा दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. पुढील एका वर्षात नदी जोड प्रकल्पाचे काम सुरू होणार असल्याचे देखील फडणवीस यांनी सांगितला आहे.

दोन राज्यांतर्गत नदी जोड प्रकल्पांना केंद्र सरकारच्या वतीने मदत केली जाते. मात्र आम्हाला राज्यांसोबत नाही तर आमच्या राज्यातच नदीजोड प्रकल्प राबवायचा आहे. त्याला देखील निधी देण्यास मान्यता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे आमची भावी पिढी दुष्काळ पाहणार नाही, असा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ही उपसा सिंचन योजना देखील सौरऊर्जेवर चालणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे.

**पाण्यासाठी संघर्ष मिटणार**

नदीजोड प्रकल्पाची मूळ संकल्पना बाळासाहेब विखे पाटील यांनी मांडली होती. ती संकल्पना पूर्ण करण्याचे काम आता त्यांचे सुपुत्र राधाकृष्ण विखे पाटील यांना मिळाले आहे. याचा आनंद असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. नाशिक आणि नगर विरुद्ध उर्वरित मराठवाडा असा संघर्ष पाहायला मिळत आहे. तो संघर्ष देखील भविष्यात दूर होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## पुढील पाच वर्षात ८ लाख घरे उभारणार; एकनाथ शिंदेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ठाणे**

पुढील पाच वर्षात म्हाडाच्या माध्यमातून ८ लाख घरे उभारली जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मात्र ही घरे उभारताना त्यांचा दर्जा उत्तम ठेवा असे सांगताना त्याची गुणवत्ता आम्ही प्रत्यक्ष पाहणीत तपासू असे सूतोवाच ही त्यांनी यावेळी केले.

ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात बुधवारी शिंदे यांच्या हस्ते कोकण विभागातील म्हाडाची लॉटरी काढण्यात आली. यावेळी २१४७ सदनिका आणि ११७ भूखंड विक्रीची सोडत काढण्यात आली. यावेळी त्यांच्या समवेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुख्य अधिकारी रेवती गायकर,



ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव आदींसह इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते. प्रत्येकाचे स्वप्न असते की आपल्याला हक्काचं घर मिळाला पाहिजे आणि चांगलं घर मिळाला आणि परवडणाऱ्या किमतीमध्ये मिळाला पाहिजे त्यांचे हे स्वप्न पूर्ण करण्याचे काम म्हाडा करत असल्याचेही त्यांनी सांगितले. आम्ही गेले अडीच वर्षापासून काम करत आहोत, रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याचा प्रयत्न करत आहोत, काही अडथळे होते स्पीड ब्रेकर होते, ते आम्ही दूर केले असून आता राज्याचा विकास सुरू असल्याचेही ते म्हणाले.

म्हाडाची विश्वासार्हता वाढलेली आहे, तसेच गुणवत्ता सुधारली आहे, परंतु हे करीत असताना लोकांना चांगली घरे दिली गेली पाहिजे, घरामध्ये गळती होता कामा नये, छान भिंती असल्या पाहिजे याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केली. माझ्याकडे आता नगरविकास आणि गृह निर्माण खाते आहे त्यामुळे तुम्हाला आता नियमात काही बदल करायचे असतील तर करा, मात्र गुणवत्ता चांगली द्या असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधनाचा वापर करा - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अकोला**

कृषी पदवीधरांनी शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन यांचा वापर शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी करावा, असे प्रतिपादन विद्यापीठ कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३९ वा दीक्षांत समारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रतिकुलपती तथा राज्याचे कृषी



मंत्री ड. माणिकराव कोकाटे, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड. आकाश फुंडकर, कर्नाटक कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष अशोक दलवाई, कुलगुरू डॉ. शरद गडाख, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ चंद्रमणी, आमदार अमोल मिटकरी, आमदार हरिश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. समारंभात विविध विद्याशाखांच्या एकूण ४ हजार ४० स्नातकांना विविध पदव्या प्रदान करण्यात आल्या.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, ज्ञान मिळवणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. देशाच्या कृषी क्षेत्राला अधिकाधिक प्रगत करण्याची जबाबदारी नवपदवीधरांना पार पाडायची आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने बीजनिर्मिती, पशुधन विकास, आदर्श ग्राम प्रकल्प अशा उपक्रमांबरोबरच नवनव्या अभ्यासक्रमातून अनेक विद्याशाखांचा विकास केला आहे.

ते पुढे म्हणाले की, ज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची झेप जगभरात देदिप्यमान ठरली आहे. औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्रातही तितकीच उल्लेखनीय प्रगती करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानप्राप्ती, त्याचे उपयोजन व करावयाचे कार्य याबाबत निश्चित ध्येय ठरवून त्यानुसार वाटचाल करावी.

**शेतीसाठी नवतंत्रज्ञानाचा वापर : कृषी मंत्री**

कृषी मंत्री श्री. कोकाटे म्हणाले की, जगभरात विविध क्षेत्रांत अनेकविध बदल होत असून, त्यानुसार कृषी क्षेत्रातही बदल घडवणे आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनखर्चात कपात व उत्पन्नात वाढ यासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे. 'एआय'सारख्या नवतंत्रज्ञानाचा वापर शेतीसाठी व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे कृषी मंत्री म्हणाले.

## कराड-मुंडेंना दिलासा: ED चौकशीबाबतची याचिका कोर्टाने फेटाळली, याचिकाकर्त्याला दंड!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या अनेक शेल कंपन्या आहेत. तसंच खंडणीची रक्कम या कंपन्यांमध्ये वळती केल्याचा गंभीर आरोप करत या प्रकरणाचा तपास हायकोर्टाच्या देखरेखीखाली चालावा आणि ईडीनेही याप्रकरणी समांतर तपास करावा, यासाठी कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र ही याचिका फेटाळून लावत याचिका मागे न घेतल्यास याचिकाकर्त्यांना २० हजार रुपयांचा दंड ठोठवावा, असे आदेश कोर्टाकडून देण्यात आले आहेत.

धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड या दोघांशी संबंधित विविध प्रकरणे समोर आल्यानंतर आरटीआय कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली. मात्र या प्रकरणाशी याचिकाकर्त्यांचा काय संबंध आहे आणि त्यांना काय साध्य करायचं आहे, हे स्पष्ट होत नसल्याचं निरीक्षण नोंदवत कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

## संपादकीय ......

# पडताळणी बहिणींची...!

महाराष्ट्रातील पात्र महिलांच्या खात्यात दरमहा थेट १५०० रुपये जमा करणारी 'लाडकी बहीण' योजना. 'किसान सन्मान'मध्ये दोन एकरांपर्यंत शेती असलेल्या संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी प्रत्येकी २ हजार रुपये मिळतात. या हिशेबाने २०२५ च्या सुरुवातीला या प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यात असे पैसे विसाव्यांदा जमा होणार आहेत. म्हणजेच संपूर्ण भारतातील या योजनेच्या सुमारे ११ कोटी लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण प्रत्येकी ४० हजार रुपये जमा झालेले असतील.

या योजनेतील पैसा थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत असल्यामुळे त्यात एकाही पैशाचा भ्रष्टाचार होण्याची शक्यताच नाही. तसेच आपल्या महाराष्ट्रात सुमारे २.५० कोटी पात्र लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये जवळपास सहा महिन्यांपासून दिले जात आहेत. ही रक्कमसुद्धा या लाडक्या बहिणींच्या खात्यात थेट जमा होत असल्यामुळे त्यातही भ्रष्टाचाराला वावच नाही. वर्षभरात त्यांना जवळपास ४० हजार कोटी रुपये दिले जातील; ते पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त असतील. पण समजा त्याच तिजोरीतून असे ४० हजार कोटी वेगवेगळ्या विकास कामांवर खर्च झाले तर त्यात कमीत कमी १० हजार कोटींचा भ्रष्टाचार अधिकृतपणे होईल. सरकारी कामांमधील जाणकारांच्या मते तर ४० हजार कोटींमध्ये जवळपास अर्धा, म्हणजेच, २० हजार कोटींचा भ्रष्टाचार होत असतो. त्यात शेवटी प्रत्यक्ष काम करणारा ठेकेदार बिगार भरतो, कचरा काम करतो, हेही आलेच. त्यातच परवाच बीड जिल्ह्यातील भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी अशा भ्रष्टाचाराबाबत सनसनाटी आरोप करून धमाल उडवून दिली आहे.

आ. धस यांनी, धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री असताना त्यांनी चक्क ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिले दाखवून त्याचे पैसे उचलल्याचे पुराव्यांनिशी आणि तारीखवार सांगितले आहे. एकाही रुपयाचे काम न करता ७३,३६,००,००० इतके पैसे पूर्णपणे खाऊन टाकल्याचे आ. धस यांनी जाहीरपणे सांगितले आहे. म्हणजे १०० टक्के भ्रष्टाचार आणि तिजोरीही तीच महाराष्ट्र सरकारची, म्हणजेच तुमची-आमची सर्वांची..! कुठल्याही लोकोपयोगी योजनेतून, त्यातील नियम, निकषांना बाजूला ठेवून प्रसंगी खोटी माहिती देऊन, आपला कार्यभाग घेण्याची अनेकांची मानसिकता असते. तसेच काही 'लाडक्या बहिणीं'नीही केले असल्याचे गेल्या सहा महिन्यांत उघडकीस आले आहे. सध्याच्या महाराष्ट्रातील महायुती सरकारनेच आपल्या गेल्या कार्यकाळात जुलै २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली. यात पात्र बहिणींच्या थेट बँक खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करण्याचा प्रस्ताव होता. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज केले. त्यापैकी २ कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या.त्यातील कोणतीही त्रुटी नसलेल्या २ कोटी ३४ लाख महिलांना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी दरमहा १५०० या हिशेबाने पाच महिन्यांत ७५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात देण्यात आले. या एकूण २.३४ कोटींपैकी कित्येक महिला पाच महिन्यांत ७५०० रुपये तर सोडाच; पण त्यांच्या आयुष्यात कोणत्याही महिन्यात एकरकमी १५०० रुपयेसुद्धा पहिलेल्या नव्हत्या. ही वस्तुस्थिती नाकारण्यासारखी नाहीच.परिणामी, या बहिणींनीही आपले लाडके भाऊ कोण हे ठरवून टाकले. महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मतांचे दान देऊन दणदणीत बहुमताने पुन्हा सत्तेत बसवले. पण पुढे नियमांप्रमाणे पडताळणी दरम्यान काही अपात्र बहिणींनी या योजनेत घुसखोरी केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी चुकीची माहिती देऊन किंवा दडवून ठेवून 'लाडकी बहीण' ही पात्रता मिळवल्याचे स्पष्ट झाले. आधीपासूनच सुरू असलेल्या संजय गांधी निराधार योजनेतून निराधार बहिणींना दरमहा १५०० रुपये मिळतच आहेत.या बहिणी पुन्हा 'लाडकी' होण्यासाठी पात्र नव्हत्याच. प्रधानमंत्री 'शेतकरी सन्मान योजने'त काही महिलांना १००० रुपये मिळतच आहेत. त्यांना ५०० रुपयेच 'लाडकी'मध्ये देण्याची तरतूद आहे. याशिवाय आयकरदाते कुटुंब, चारचाकी वाहन असलेले कुटुंब यांनाही या योजनेत स्थान नाही. ज्या लाडक्या बहिणींनी या योजनेचा लाभ घेतला त्यांना पडताळणी करून वगळण्यात येणार आहे. 'पडताळणी'ची अपेक्षा नसणाऱ्या काही अपात्र बहिणींनी लाडकीमध्ये जमवून घेतले. पण आता पडताळणीत बिंग फुटेल या भीतीने चार ते पाच हजार बहिणींनी स्वत:हून आता यातून माघार घेतली आहे. अशा लाडक्या नसलेल्या बहिणी कदाचित ४ ते ५ लाखांवर जाऊ शकतील असाही एक अंदाज आहे. काहीही होवो, सध्याच्या २ कोटी ४७ लाखांपैकी २.४० कोटी बहिणी मात्र पात्र आणि लाडक्या राहणारच आहेत, हे निश्चित.

## स्वच्छ भारत अभियान :

# विद्यार्थ्यांनी दिला चित्रकला, रांगोळी, निबंधाद्वारे स्वच्छतेचा सकारात्मक संदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती-** महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण २०२४ राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या निर्देशानुसार स्वच्छता अभियान राबविण्याच्या दृष्टीने आज दिनांक ४ फेब्रुवारी,२०२५ रोजी महानगरपालिका मध्य झोन क्रमांक २ राजापेठ अंतर्गत महानगरपालिका शाळा क्र.८ रामनगर येथील शाळेत विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेवर आधारित चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित केली. यावेळी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे यांच्यासह शिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी सुंदर चित्रे रेखाटून लोकांना स्वच्छते बद्दल सकारात्मक संदेश दिला. स्वच्छता अभियानांतर्गत, विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता पसरविण्यासाठी स्वच्छतेवर आधारित रांगोळी, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे सकारात्मक संदेश देणारी रांगोळी बनवून आणि सुंदर चित्रे रंगवून उत्साहाने भाग घेतला तसेच निबंध लेखन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर उत्कृष्ठ निबंध लेखन केले. महानगरपालिका शिक्षकांसह अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांनी विद्यार्थी मुलांच्या प्रतिभेचे कौतुक केले आणि महानगरपालिका झोन क्र.२ च्या वतीने प्रोत्साहन म्हणून त्यांना प्रमाणपत्र वितरीत केले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत शाळेत विद्यार्थी आणि शिक्षकांसह, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे व स्वास्थ निरीक्षकांनी सामूहिक स्वच्छतेची शपथ घेतली. महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले तसेच शाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पोषण आहाराची देखील चौकशी केली.

# भुईमुगातील शेंगाचे व तेलाचे उत्पादन वाढविण्यासाठी करा हे उपाय




विदर्भ प्रजासत्ताक
कृषी विशेष

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**
मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष करत उत्पादन घेतल्यानंतर, कमी उत्पन्न मिळत असल्याचा अनुभव पदरी पडल्यास, भुईमुगाची लागवडीपासून करण्यापासून शेतकरी बाजूला जात असल्याचे चित्र, प्रत्येक गावात कमी अधिक प्रमाणात भुईमुगाची लागवड होत आहे.

उत्तम व्यवस्थापन केल्यास भुईमुगाचे एकरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन होते. १०० किलो शेंगा फोडल्या तर ७० किलो शेंगदाणे मिळतात. त्या हिशेबाने एक एकर क्षेत्रात जवळपास दहा क्विंटल शेंगदाण्याचे उत्पादन मिळते.

प्रतिकिलोस १०० रुपये असा ठोक भाव धरल्यास प्रतिएकरी १ लाख रुपये मिळतात. ४० हजार रुपये उत्पादन खर्च वजा करता तीन महिन्यात ६० हजार रुपये नफा एका एकरात मिळतो.

भुईमुगाच्या शेंगा जमिनीत वाढत असल्याने जमीन सेंद्रिय पदार्थाने समृध्द, मध्यम भुसभुशीत असणे गरजेचे असते. या पिकाची आंतरमशागत पेरणीपासून तीस दिवसाच्या आतच झाली पाहिजे.

अन्यथा चाळीस दिवसांच्या पुढे त्याला आऱ्या सुटतात. आंतरमशागत करताना आऱ्यांना धक्का लागल्यास शेंगा कमी प्रमाणात लागतात. परिणामी उत्पादन कमी होते. बहुसंख्य शेतकरी या दोन प्रमुख बाबी लक्षात घेत नाहीत.

हलक्या व निकृष्ट जमिनीवर भुईमुगाचे पीक घेतले जाते. आंतरमशागतीसाठी योग्य कालावधीकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. त्यामुळे अपेक्षित उत्पादन हातात येत नाही.




**१२५ दिवसांत तयार होते पीक** -भुईमूग हे खरिपात ही घेतले जाणारे महत्त्वाचे तेल बिया पीक आहे. महाराष्ट्रात जवळपास दोन लाख हेक्टर खरीप हंगामात हे पीक घेतले जाते. उपट्या जातीचा भुईमूग १०० ते १०५ दिवसात तर निमपसरी भुईमूग १२० ते १२५ दिवसांत तयार होणारे पीक आहे.

**अशी घ्या पिकाची काळजी**

भुईमुगावर टिक्का हा रोग पडतो. पाने गुंडाळणारी अळी ही कीड पडते. टिक्का रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब या बुरशीनाशक दोन ग्रॅम प्रतिलिटर पाणी अधिक कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक एक ग्रॅम प्रतिलिटर पाणी याची फवारणी घेतली तर रोग नियंत्रणात येतो.

पाने गुंडाळणाऱ्या अळीचा बंदोबस्त करण्यासाठी क्लोरोपायरीफॉस अधिक सायफरमेथ्रीन असे संयुक्त कीटकनाशक एक मिलिमीटर प्रतिलिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारावे.

भुईमुगाचे उत्पादन वाढवण्यासाठी विशेष उपाय म्हणून जिप्सम दोनशे किलो प्रतिएकर वापर करावा.

शेंगदाण्यातील तेलाचे प्रमाण वाढवण्याबरोबर त्याचे उत्पादन वाढवण्यासाठी झिंक या सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी केल्यास अपेक्षित परिणाम होतो.

## आरोग्य संपदा आहार




# या लोकांनी चिकू खाऊ नये, फायद्याऐवजी होईल नुकसान



**दि.५विदर्भप्रजासत्ताक**
आजकाल बाजारात गोड आणि रसाळ चिकू उपलब्ध आहेत.चिकू खाणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. फायबरने समृद्ध असलेले चिकू हे पोट आणि पचनासाठी एक उत्कृष्ट फळ आहे. पण जास्त प्रमाणात ते खाल्ल्याने फायद्याऐवजी नुकसान होऊ शकते. चिकूमध्ये मध्ये दाहक-विरोधी गुणधर्म आढळतात. त्यामुळे, ते बद्धकोष्ठता, सूज आणि सांधेदुखीमध्ये आराम देते. तथापि, जास्त प्रमाणात चिकू खाणे काही लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

**चिकू खाण्याचे नुकसान, ते कोणी खाऊ नये?**

मधुमेह- मधुमेहींनी चिकू खाऊ नये.ते खूप गोड असतात. म्हणूनच, डॉक्टर मधुमेहात चिकू न खाण्याचा सल्ला देतात. यामुळे साखरेची पातळी वाढू शकते. .

ॲलर्जी- जर तुम्हाला ॲलर्जी असेल तर चिकू खाणे टाळा. काही लोकांना चिकू खाण्याची ॲलर्जी असू शकते. कारण त्यात टॅनिन आणि लेटेक्स नावाचे रसायने असतात जे शरीरात ऍलर्जी निर्माण करतात. म्हणून चिकू खाणे टाळण्याचा सल्ला दिला जातो.

पचन - चिकू हे पोट आणि पचनासाठी चांगले फळ आहे. त्यात फायबर चांगल्या प्रमाणात आढळते. ज्यामुळे, आतड्यांचे आरोग्य सुधारते. पण जास्त प्रमाणात चिकू खाल्ल्याने आपल्या पचनसंस्थेवरही ताण येऊ शकतो. ज्यामुळे, पचनाच्या समस्या देखील वाढू शकतात.

वजन वाढवा- चिकू खाल्ल्याने कधीकधी लठ्ठपणा देखील वाढतो. ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने वजन वाढण्यास मदत होते. विशेषतः जे चिकूचा शेक बनवतात आणि पितात त्यांना वजन वाढण्याचा धोका जास्त असतो.

चवीत बदल - कधीकधी चिकू खाल्ल्यानंतर चवीत बदल जाणवू शकतो. विशेषतः जर तुम्ही कधी कच्चे चिकू फळ खाल्ले तर ते तुमच्या तोंडाला कडू चव आणते. चिकूमध्ये भरपूर लेटेक्स आणि टॅनिन असते, ज्यामुळे तोंडाची चव कडू होते.

# मागेल त्याला सौर कृषी पंप शंभर दिवसांचे उद्दीष्ट साठ दिवसात पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने निश्चित केलेल्या शंभर दिवसांच्या उद्दीष्टांपैकी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजने'त ५२,७०५ सौर पंप बसविण्याचे उद्दीष्ट महावितरणने साठ दिवसात पूर्ण केले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर शंभर दिवसात म्हणजे दि. १६ मार्च २०२५ पर्यंत विविध विभागांसाठी उद्दीष्टे निश्चित करण्यात आली आहेत. महावितरणने या कालावधीत मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत एकूण दीड लाख पंप बसविण्याचा टप्पा गाठण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले होते. दि. ६ डिसेंबर रोजी ९७,२९५ सौर कृषी पंप



बसविण्यात आले होते. त्यानंतर दि. ४ फेब्रुवारीपर्यंत महावितरणने ५३,००९ सौर कृषी पंप बसविले. त्यामुळे मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत आतापर्यंत बसविलेल्या पंपांची संख्या १,५०,३०४ झाली आहे. महावितरणला शंभर दिवसात ५२,७०५ पंप बसवायचे उद्दीष्ट होते पण साठ दिवसात ५३,००९ सौर पंप बसविण्यात आले.राज्यात ४ फेब्रुवारी अखेर बसविलेल्या १,५०,३०४ सौर कृषी पंपांमध्ये जालना (१८,४९४ पंप), बीड (१७,९४४), अहिल्यानगर (१३,३६६), परभणी (११,७५५), संभाजीनगर (९,३२९), नाशिक (९,१४३), हिंगोली (८,५३८), धाराशीव (६७६५) आणि जळगाव (६६४८) या जिल्ह्यांनी आघाडी घेतली आहे.मागेल त्याला सौर कृषी पंप या राज्य सरकारच्या योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के आणि राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे सौर पॅनेल्स, कृषी पंप असा संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के असून त्यांना ९५ टक्के अनुदान मिळते.

# विद्यापीठात ६ व ७ फेब्रुवारी रोजी उद्योग - शिक्षण क्षेत्र संलग्नता कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्यावतीने ६ व ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी विद्यापीठ/शिक्षण-उद्योग संलग्नता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे..

कार्यक्रमात उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती सहभागी होणार असून शिक्षण आणि उद्योग यांच्यातील अंतर कमी करणे, विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कफिल अहमद, संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, रेसिनो बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, नवी मुंबई, डॉ. मंजू विश्वकर्मा, महाव्यवस्थापक, अंकुर सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर, डॉ. आशिष पोलकाडे, संचालक, बेस्ट इको सोल्यूशन्स अँड टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांची उपस्थिती लाभणार असून उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. प्रवीण राव, प्रमुख, आर. अँड डी. रिलायन्स लाईफ सायन्सेस, नवी मुंबई, डॉ. मनोज रामटेके, टीम लीडर, ऑरिजेन फार्मास्युटिकल सर्विसेस



लिमिटेड, हैदराबाद, डॉ. रामदास व्ही. राऊत, व्यवस्थापक, निर्मल सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, पाचोरा, जळगाव, श्री. जे. एन. कपाडिया, संस्थापक, जे.के. मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेड, अमरावती, श्री. संदीप अजमेरे, संचालक, सन हेल्थ केअर, अमरावती, श्री. ध्रूव डागा, कार्यकारी संचालक, प्लास्टी-सर्जे इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, अमरावती मार्गदर्शन करणार आहेत.

दुसऱ्या दिवसी ७ फेब्रुवारी रोजी डॉ. मनोज रामटेके, डॉ. रामदास व्ही. राऊत, श्री. ध्रूव डागा, डॉ. प्रवीण राव मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमामध्ये जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन संधी, उद्योगांच्या गरजा आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका यावर विस्तृत चर्चा केली जाणार असून कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. ए. एस. पाटील, डॉ. पी. व्ही. ठाकरे, सुदर्शन डी. कोवे यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण


# आंबेडकरांच्या मृत्यूला कोण जबाबदार?

## राज्यसभेत डॉ. अनिल बोंडेंचा मोठा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नवी दिल्ली** भाजपचे राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांनी मंगळवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूबाबत मोठा दावा केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना काँग्रेसवर निशाणा साधताना बोंडे यांनी हा दावा केला आहे. त्यांनी डमी बापू, लिब्रांडू असे शब्द वापरल्याने राज्यसभेत वादही निर्माण झाला.अनिल बोंडे यांनी राज्यसभेत मंगळवारी १७ मिनिटे भाषण केले. ब्रोंडे यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना मोर्दीच्या



कामाचे तोंडभरून कौतुक केले. जवळपास १७ मिनिटांच्या भाषणात त्यांनी महाराष्ट्रातील विकासासह दिल्लीतील असुविधांचा उल्लेख करून त्यावरून आम आदमी पक्षावर निशाणा साधला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवडणुकीविषयीच्या धनंजय कीर यांच्या लेखनाचा संदर्भ देताना बोंडेनी सांगितले की, पंतप्रधान नेहरू असताना निवडणूक आयोगाने आंबेडकरांची ७८ हजार मते अवैध ठरवली होती. नेहरू दोनदा विरोधात प्रचारासाठी गेले होते. जयप्रकाश नारायण यांनीही संशय व्यक्त केला होता. आंबेडकरांना केवळ प्रचार करून हरवले नाही तर ७८ हजार मते अवैध ठरवून हरविण्यात आले. एकदा पराभव झाल्यानंतर आंबेडकर। आजारी पडले होते, त्यांना डायबिटीज सुरू झाला. भंडाराच्या पोटनिवडणुकीतही काँग्रेसने आंबेडकरांचा पराभव केला. तिथेही पंतप्रधान। प्रचाराला गेले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या। दत्तोपंत ठेंगडी यांनी आंबेडकरांचा प्रचार केला होता. १९५४ मध्ये पराभवाचा मोठा धक्का आंबेडकरांना बसला होता. हा धक्का बसल्यानंतर १९५६ मध्ये डॉ. आंबेडकर हे जग सोडून गेले. ते दोन पराभव त्यांच्या मृत्यूला जबाबदार होते, असे बोंडे म्हणाले. आंबेडकरांच्या मृत्यूलाही हे दोन पराभव जे काँग्रेसने जाणीवपूर्वक केले होते, तेच जबाबदार होते. महाराष्ट्रात जे बोलले जात होते तेच मी सांगत आहे, असा मोठा दावा बोंडे यांनी यावेळी केला.

# श्वेता सिंघल अमरावतीच्या नव्या विभागीय आयुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.५अमरावती–** अमरावतीच्या विभागीय आयुक्त पदावर राजभवन येथील सचिव श्वेता सिंघल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील १३ भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकाऱ्यांच्या आज मंगळवारी बदल्या करण्यात आल्यात. यामध्ये मुंबईच्या राजभवन येथील उपसचिव असणाऱ्या श्वेता सिंघल यांची अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. श्वेता सिंघल या २००९ च्या भारतीय प्रशासनिक सेवा तुकडीच्या अधिकारी आहेत. यापूर्वीश्वेता सिंघल या सातारा येथे २४ एप्रिल २०१७ ते १८ जानेवारी



२०२० या काळात जिल्हाधिकारी होत्या. त्यानंतर त्यांची राजभवन येथे सचिव म्हणून बदली करण्यात आली होती. लवकरच त्या विभागीय आयुक्त पदाचा पद्धार स्वीकारणार असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्यमान विभागीय आयुक्त निधी पाडेय यांची अद्यापही अन्य पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही.

# महापालिकेने शासनाला मागितली दोन हेक्टर ई-क्लास जमीन

## ई-बस डेपोसाठी कोंडेश्वर नाका येथील जमिनीचा प्रस्ताव महसूल विभागाकडे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** महानगर पालिकेला केंद्र सरकारकडून शहरातील हवा शुद्ध राहावी यासाठी ५० इलेक्ट्रीक बसेस मंजूर झाल्या असून त्यासाठी मनपाला शहरात आवश्यक मोठी जागाच मिळेनाशी झाली आहे. त्यामुळे मनपाने जिल्हाधिकाऱ्यांकडे कोंडेश्वर नाका येथील २ हेक्टर शासनाची ई-क्लास जमीन मागितली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव शासनाच्या महसूल मंत्रालयाकडे पाठवला असून येत्या १५ दिवसांत जागा मनपाला मिळण्याची शक्यता आहे, सध्या फाईल मंजुरीसाठी उपमुख्यमंत्र्यांकडे असल्याची माहिती मनपा आयुक्तांनी दिली. जमीन मिळाल्यानंतर लगेच तेथे इलेक्ट्रीक सिटी बससाठी डेपो उभारता येईल. या ठिकाणी चार्जिंग स्टेशन, इलेक्ट्रीक बस डेपो व त्यांच्या देखभाल दुरुस्तीचेकेंद्र राहणार असल्याची माहिती मनपाच्या कार्यशाळा विभागाद्वारे देण्यात आली.मनपाला १० लाख लोकसंख्येच्या आतील शुद्ध हवेचे शहर म्हणून प्रथम पुरस्कार मिळाला होता. त्यामुळे शहरातील हवा ही पावती यासाठी केंद्र शासनाने त्याचवेळी जास्तीत जास्त स्वच्छ असावी, इलेक्ट्रीक बससाठी प्रस्ताव तयार करून पाठवण्यास सांगितले होते. त्यानंतर मनपाने प्रस्ताव तयार करून तो केंद्र शासनाकडे पाठवला. हा प्रस्ताव केंद्राला मिळाल्यानंतर एका महिन्यातच ५० इलेक्ट्रीक बसेस मंजूर करण्यात आल्या.एकाचवेळी ९ मीटरच्या ५० तर १२ मी.च्या १० अशा एकूण ५० इलेक्ट्रीक बसेस उभ्या राहतील, एवढी मोठी जागा शहरात सध्या मनपाकडे उपलब्ध नाही. कारण, यासाठी किमान काही एकर जागा लागणार आहे. एवढी जागा सध्या शहरात मनपाला मिळणे शक्य नाही.त्यामुळे त्यांनी कोंडेश्वर या भागातील जागा निश्चित केली आहे. शासनाकडून जागा मनपाला हस्तांतरित झाल्यानंतर लगेच काम सुरू केले जाईल. मनपाने शहरात जागेचा बराच वेळ शोध घेतला. परंतु, हवी तशी जागा मिळाली नसल्याने अखेर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे जागेची मागणी केली.

### लवकरच जमिनीचा ताबा मिळेल



येत्या ८ ते १५ दिवसांत जमिनीचा ताबा मिळण्याची शक्यता आहे. प्रस्ताव सध्या उपमुख्यमंत्र्यांकडे गेला आहे. इलेक्ट्रीक बसेस सुरू झाल्यानंतर इंधनावर चालणाऱ्या सिटी बसेस पूर्णतः बंद केल्या जातील. त्यामुळे शहरातील वायू प्रदूषण कमी होईल.

– सचिन कलंत्रे, आयुक्त, मनपा.

# शासकीय गायरान जमिनीवर मग्रारोहयो अंतर्गत चारा लागवड

## दुग्धोत्पादनाला चालना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :**

शासकीय गायरान जमिनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) चारा लागवड करून दुग्धोत्पादनाला चालना देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम दर्यापूर तालुक्यातील टोंगलाबाद येथे सुरू झाला आहे. कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे हा उपक्रम साकारला आहे.

टोंगलाबाद येथे ग्रामपंचायत, पंचायत समिती दर्यापूर, पशुसंवर्धन विभाग आणि गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी सरपंच वैशाली पानझाडे, गटविकास अधिकारी सी. जे. ढवके, पशुसंवर्धन विभागाचे सहायक उपायुक्त डॉ. बोडखे, पशुधन विकास अधिकारी डॉ. निचड यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

दोन हेक्टरवर चारा उत्पादन: टोंगलाबाद येथील दोन हेक्टर शासकीय गायरान जमिनीवर हिरव्या चाऱ्याची लागवड करण्यात आली आहे.



यामधून सुमारे ६५० टन चारा उत्पादन होईल, असा अंदाज आहे. याव्यतिरिक्त, पुढील तीन महिन्यांत आणखी चारा उपलब्ध होणार आहे. या उपक्रमांतर्गत दर्यापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींना हिरव्या चाऱ्याचे थांबे (रोपे) पुरवले जाणार आहेत.

राज्यातील १४ जिल्ह्यांसाठी आदर्श: कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या माध्यमातून राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. टोंगलाबाद येथील प्रकल्प इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरणार आहे, असे ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले.

शेतकरी समृद्धीचा मार्ग: या उपक्रमामुळे जनावरांना पुरेसा चारा मिळेल, दुध उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. यामुळे शेतकऱ्यांच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचे २३ व २४ रोजी अधिवेशन

## पत्रकार परिषदेत ॲड. वामनराव चटप यांनी दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** विदर्भ राज्य आंदोलन समितीने आंदोलनाची तीव्रता वाढण्याच्या दृष्टीने लोकसहभाग वाढविण्याच्या हेतुने व लढ़कच्या खंबीर वैचारीक कार्यकत्यांचा आंदोलनात सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी तिसरे अधिवेशन येत्या २३ व २४ मार्च रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. याबाबतची माहीती आज माजी आमदार व विदर्भवादी ॲड. बामनराव चटप यांनी दिली.स्थानिक राजापेठ येथील अमरावती श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रपरिषदेत त्यांनी सांगितले की, विदर्भाच्या विकासासाठी विदर्भाचे स्वतंत्र राज्य हाच एकमेव पर्याय आहे.राज्यकर्त्यांनी याकडे





सपशेल दुर्लक्ष केले आहे. आम्ही स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीसाठी संघर्ष करीत आहोत. हाच संघर्ष पुढेही सुरु राहणार आहे. नागपूर येथे २३ व २४ मार्च रोजी विदर्भ राज्य आंदोलनात सक्रियता वाढविण्यासाठी तिसरे अधिवेशन होत आहे. अधिवेशनात विदर्भाचा अनुशेष अभ्यासातुन मांडण्यात येणार आहे.आज विदर्भात आ वासून उभ्या असलेला शेतकरी आत्महत्या, प्रदुषण, कुपोषण व त्यामुळे होणारे बालमृत्यु व गंभीर माता मृत्यू बेरोजगारीमुळे तयार झालेला नक्षलवादाचा गंभीर प्रश्न यावर सखोल अभ्यास करून मांडणी करण्याकरीता विदर्भातील समाजमन जागविण्याकरीता अधिवेशनाचे आयोजन केले आहे.विदर्भाचे राज्य हे सहाम व शिलकीचे होणार आहे, हे दर्शविणारा अर्थसंकल्प डॉ. श्रीनिवास खांदेवाले मांडणार आहे.विदर्भाचे राज्य निर्माण करण्याचे अधिकार घटनेतील कलम ३ प्रमाणे केंद्र सरकारला असुन विदर्भातील जनतेचे व्यापक जनहित लक्षात घेऊन केंद्रसरकारने १२० वर्षापासुन (सन १९०५) सुरु असलेली विदर्भ राज्याची मागणी निकाली काढण्याकरीता, निर्णय घेऊन तात्काळ विदर्भ राज्य निर्माण करावे व विदर्भातील माणसाला देशातील इतर नागरीकाप्रमाणे 'माणुस म्हणून सन्मानाने व सुखाने जगण्याचा अधिकार प्रदान करावा यासाठीचा लढा अधिवेशनानंतर पुढील आंदोलनाची दिशा ठरवुन तीव्र केला जाणार आहे. याकरिताच सदर अधिवेशन असल्याचे ॲड. वामनराव चटप यांनी सांगितले.पत्रपरिषदेला समितीच्या पदाधिकारी श्रीमती रंजना मामडे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, दिलीप घोवर, प्रा. पी. आर. राजपूत, डॉ. विजय कुबडे, रियाज खान, सुनील साबळे, गणेश कुसराम, अशोक हांडे, विनाताई मुडे, पांडुरंग सोनवणे, प्रकाशभाई लड्का, सतीश प्रेमलबार उपस्थित होते.

# राष्ट्रीय नमुना पाहणी ८० वी फेरी

## आरोग्यविषयक सर्वेक्षणाची माहिती गोळा करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन हे 'कुटुंबाचा आरोग्यविषयक होणारा खर्च' विषयावर राष्ट्रीय स्तरावरील पाहणीत सहभागी होत आहे. या सर्वेक्षणासाठी डिसेंबर २०२५ पर्यंत माहिती संकलित केली जाणार आहे. सर्वेक्षण राज्यतील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविले जाणार असून यामध्ये पुढील माहिती संकलित केली जाईल .

सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय व खाजगी रुग्णालय , दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशिल इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. सर्वेक्षणांतर्गत कुटुंबांची निवड ' एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मुल असणारे कुटुंब' आणि मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती ' यामधून करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाच्या निष्कर्षाचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि शासनाच्या धारेणात्मक निर्णयाचीअंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे.

कुटुंबांकडून सदर सर्वेक्षणाची माहिती अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे प्रशिक्षित अधिकारी व

कर्मचारी, (सांख्यिकी सहायक व अन्वेषक संवर्गातील) फेब्रुवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये जिल्ह्यातील ग्रामीण भागातील निवडक गावे व शहरी भागातील निवडक भागातील निवडक कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन आरोग्यविषयक माहीती गोळा करतील.

या सर्वेक्षणाकरिता घरी येणाऱ्या उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या कुटुंबाची आरोग्य विषयक माहिती, रुग्णालयात भरती असतांना आजारपणावर झालेल्या खर्चाबाबतची योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी जिल्हयातील सर्व संबंधित कुटुंबीयांनी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अमरावती येथे संपर्क साधावा.

# जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता सज्ज व्हा

## जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

### परतवाडा येथे तालुका काँग्रेस कमिटीचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५परतवाडा–** विधान सभेतील अपयश विसरून आता जोमाने कामाला लागा, आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती, नगरपरिषद ,नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका करिता प्रत्येक पदाधिकारी व कार्यकत्यांनी सज्ज व्हा ,असा सल्ला जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिला,परतवाडा येथील तालुका ग्रामीण व शहर काँग्रेस कार्यकर्ता बैठकी वेळी व्यक्त केले, ते पुढे बोलताना म्हणाले की,महाराष्टात महाविकास आघाडीला लोकसभेला मोठे यश मिळाले मग दोन – तीन महिन्यात असे काय लोकांमध्ये परिवर्तन झाले की महायुतीला विधानसभेत मोठे यश मिळाले, आजही जनता महागाई, बेरोजगार अशा अनेक गोष्टीने त्रस्त आहेत यावरून बीजेपी आणि त्यांची सहयोगी महायुती घटक पक्षाला मिळालेले यश म्हणजे मोठा घोटाळा असा आरोप देखील त्यांनी यावेळी केला, यां कार्यक्रमावेळी मंचकावर बाजार समिती उवसभापती अमोल





चिमोटे,रविभाऊ पाटील, महेरुल्ला भाई,राजाभाऊ टवलारकर, जयदेवराव गायकवाड, दिपकसेठ अग्रवाल,विनायकराव चौधरी,बाळासाहेब उभाड, श्रीकांतभाऊ अपाले, देवेंद्रभाऊ पेटकर, इतेशामभाई नबिल, विश्वासराव गवई, नाकड साहेब,कैलाशभाऊ आवारे,अमोलभाऊ बोरेकार,सुधीरभाऊ रहाटे, नामदेवराव तनपूरे,श्रीकांतभाऊ झोडपेआदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाला बाजार समिती संचालक सुधीर राहटे, ज्ञानदेव पाटील, सरफराज, मो. अन्सार, इकबालभाई पटेल, जि. एम. खान, अजीजभाई, अमोल बदरके, जय घोरे, कैलास कडू, सचिदानंद बेलसरे, दिनेश वानखडे, साईदभाई, प्रमोद कांबळे, प्रवीण हूड, ओम घोरेसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# किसान विशेष रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी हालचाली

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५सोलापूर :-** करोना महामारी तथा टाळेबंदी काळात संपूर्ण देशातील ठप्प झालेली अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्याच्या दृष्टीने विशेषतः शेतकऱ्यांचा शेतीमाल लांब पल्ल्याच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू केलेल्या किसान रेल्वेला शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. परंतु नंतर कोणतेही कारण न देता बंद झालेली ही किसान रेल्वे आता पुन्हा सुरू होण्यासाठी मध्य रेल्वे सोलापूर विभागाकडून पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने रेल्वे प्रशासनाकडून हालचाली होत आहेत.

याबाबत माहिती देताना मध्य रेल्वे सोलापूर मंडळाचे व्यवस्थापक डॉ. सुनील मिश्रा यांनी किसान रेल्वे पुन्हा सुरू झाल्यास त्यातून रेल्वे प्रशासनाला मोठा महसूल मिळेल. शिवाय स्थानिक शेतकरी आणि लांब पल्ल्याच्या बाजारपेठांमध्ये ग्राहकांची सोय होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे पाठवण्यात येणार असल्याचे



डॉ. मिश्रा यांनी सांगितले. यापूर्वी करोना तथा टाळेबंदी काळात ठप्प झालेली अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी किसान रेल्वे सुरू करण्यात आली होती.

सुरुवातीला बंगळुरू-आदर्शनगर (दिल्ली) किसान विशेष रेल्वे मिरज-पुणे मार्गे सुरू झाली असता त्या वेळी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व करमाळा भागातील शेतकरी आणि व्यापाऱ्यांची मागणी विचारात घेता किसान विशेष रेल्वेगाडी मिरज-कुर्डूवाडी-दौंड मार्गे वळविण्यात आली होती. सांगोला रेल्वे स्थानक आणि करमाळा भागातील जेऊर रेल्वे स्थानकावरून या किसान विशेष रेल्वेच्या २०० पेक्षा जास्त फेऱ्यांतून हजारो टन फळांची निर्यात दिल्लीसह अन्य लांब पल्ल्यांच्या बाजारपेठांमध्ये झाली होती. यात प्रामुख्याने डाळिंब, द्राक्षे, केळी, पेरू, बोर यांसह कांदा व अन्य भाजीपाल्यांचा समावेश होता. किसान विशेष रेल्वे वाहतुकीचे भाडे पन्नास टक्के सवलतीचे होते.


तथापि, नंतर ही किसान विशेष रेल्वे सेवा कोणतेही कारण न देता अचानकपणे बंद करण्यात आली होती. सोलापूर जिल्ह्यात सांगोला, करमाळा, माढा, पंढरपूर आदी भागांत मोठ्या प्रमाणात फळांचे उत्पादन घेतले जाते. दिल्ली, कोलकाता, झारखंड, मुजफ्फरनगर व अन्य लांब पल्ल्यांच्या बाजारपेठांमध्ये हा शेतीमाल निर्यात करीत असताना शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना आर्थिक लाभ होत होता. ही किसान विशेष रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनीही याबाबतची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली आहे.

# एकनाथ खडसेंनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट?

## पुन्हा एकदा भाजप प्रवेशाची चर्चा; फडणवीस काही तोडगा काढणार का?

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५मुंबई-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या आधी देखील त्यांचा दिल्लीत वरीष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश झाला असल्याचे त्यांनी स्वतः सांगितले होते. मात्र राज्यातील नेतृत्वाकडून त्या वृत्ताला दुजोरा मिळाला नव्हता. त्यानंतर खडसे यांनी आपण शरद पवार यांच्याच पक्षात असल्याचे म्हटले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा एका वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने खडसे यांनी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता खडसे यांच्या नावाची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आपला भारतीय जनता पक्षात प्रवेश झाला असल्याचे त्यांनी स्वतः जाहीर केले होते. मात्र राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला नव्हता. त्यामुळे अखेर एकनाथ खडसे यांनी आपण शरद पवार यांच्या सोबतच असल्याचे जाहीर केले होते. त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा या आधी देखील अनेकदा समोर आल्या होत्या. मात्र, भारतीय जनता पक्षातील स्थानिक नेते त्यांना पक्षात घेण्यास फारसे इच्छुक नाहीत. त्यामुळे याबाबत आता पुन्हा एकदा चर्चा सुरू झाल्या आहेत.

### फडणवीस या संदर्भात काही तोडगा काढतात का?

एकनाथ खडसे आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यात फारसे सख्य नाही. हे दोन्ही नेते कायमच एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आले आहेत. भारतीय जनता पक्षात सध्या गिरीश महाजन यांचे वलय दिसून येते. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे मानले जातात. त्यामुळे त्यांचे विरोधक म्हणून ओळख असलेले एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशात अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या संदर्भात काही तोडगा काढतात का? हे पाहावे लागणार आहे.

# इंगोले कुटुंबीयांनी आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ बुद्ध विहाराला भेट दिली रमाई मूर्ती



## इंगोले कुटुंबीयांचा सर्वत्र कौतुक

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती** चांदूर बाजार तालुक्यातील जवळा शहापूर येथील इंगोले कुटुंबीयांनी आई-वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ गावातील बौद्ध विहारात माता रमाईची पंचधातूची मूर्ती भेट केली आहे. त्यामुळे त्यांच्या या कृतीच सर्वत्र कौतुक होत आहे.दिवंगत आई कासाबाई इंगोले वडील उत्तमराव इंगोले यांचे वर्ष श्राद्ध न करता गावातील बुद्ध विहाराला माता रमाईची पंचधातूची मूर्ती भेट दिली आहे.

यावेळी गावातील सरपंच, जनार्दन इंगोले, गोवर्धन इंगोले, प्रभुदास इंगोले, संजय इंगोले, रत्ना इंगोले, वंदना इंगोले, अर्चना इंगोले तसेच समजते इंगोले परिवार तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. यावेळी आज दिनांक ०४ फेब्रुवारीला मुर्ती स्थापनेचा भव्य कार्यक्रम गावात पार पडला.

# संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या घरावर आयकर विभागाचा छापा

## सकाळी सहा वाजेपासून पथकाकडून झाडाझडती सुरु

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५सातारा-** संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या घरावर आयकर विभागाचा छापा पडला आहे. सकाळी सहा वाजेपासून आयकर विभागाकडून त्यांची चौकशी सुरू आहे. संजीवराजे नाईक निंबाळकर हे रामराजे निंबाळकर यांचे चुलत बंधू आहेत. सकाळी सहा वाजता आयकर विभागाचे पथक संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या घरी दाखल झाले. तेव्हापासून पथकाकडून झाडाझडती सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष असलेल्या संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या फलटण येथील लक्ष्मी नगर भागातील निवासस्थानी आज सकाळी आयकर विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी छापा घातला आहे. तेथे तपासणी सुरू आहे. निवासस्थानामधील सर्वांचे मोबाईल हँडसेट काढून घेण्यात आले आहेत. तेथे कुणाचाही संपर्क होत नाही. कडेकोट बंदोबस्त आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे ते चुलत बंधू आहेत. या बाबत कुणालाही माहिती देण्यात आलेली नाही. सकाळी सहा वाजल्यापासूनच ही तपासणी सुरू आहे फलटणमध्ये मात्र यामुळे खळबळ उडाली आहे.

**अजित पवारांसोबत परत येण्याची चर्चा**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये जोरदार



इन्कमिंग झाले होते. महत्त्वाचे म्हणजे अजित पवारांची साथ सोडून अनेक जण शरद पवार यांच्यासोबत आले होते. त्यामध्ये फलटणमध्ये रामराजे नाईक निंबाळकर यांचे चुलत बंधू संजीवराजे नाईक निंबाळकर आणि त्यांचा मुलगा अनिकेतराजे नाईक निबंळकर यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला होता. रामराजे नाईक निंबाळकर यांच्या वतीने संजीवराजे हे फलटणचे राजकारण संभाळतात. मात्र, भाजपाचे माजी खासदार रणजित सिंह निंबाळकर यांना कंटाळून संजीवराजे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला होता. महत्त्वाचे म्हणजे रामराजे यांच्या पाठींब्यानेच हा प्रवेश झाला होत, असे म्हटले जात होते. मात्र रामराजे नाईक निंबाळकर यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच राहणे पसंत केले होते. मात्र आता संजीवराजे नाईक निंबाळकर हे पुन्हा एकदा अजित पवार गटात घरवापसी करणार असल्याची चर्चा सुरु होती. त्यातच त्यांच्या घरावर आयकर विभागाने छापा टाकला आहे.

# अकोट शहरात हेल्मेट सक्ती लागू ३०० वाहन चालकांनी भरला दंड

## पोलिस कर्मचाऱ्यांनाही भूर्दंड, हेल्मेट खरेदीसाठी चालकांची झुंबड



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५आकोट-** अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिस विभागाकडून शहरात हेल्मेट सक्ती मोहिम राबवण्याचा निर्णय घेतला असून १ फेब्रुवारीपासून विविध मार्गांवर ही कारवाई राबवली जात आहे. शहरात राबवलेल्या या कारवाईत विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या ३०० हून अधिक वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. हेल्मेट न वापरणाऱ्यांमध्ये काही पोलिस कर्मचाऱ्यांचा देखील समावेश असून त्यांना सुद्धा दंड आकारण्यात आला आहे.

दरम्यान मंगळवारी मुख्य मार्गावर अनेकांनी पोलिसांचा ताफा पाहून पर्यायी मार्गावरून जाण्यास प्राधान्य दिले तर काहींना पोलिसांचा अंदाज न आल्याने दंडात्मक कारवाईचा सामना करावा लागल्याचे चित्र पहावयास मिळाले. अकोटात गेल्या वर्षात अपघातांमध्ये विना हेल्मेट अनेक दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला आहे. दरवर्षी विनाहेल्मेट व वाहतूक नियम न पाळल्याने नागरिकांचा अपघाती मृत्यू होत असतो. हे प्रमाण कमी करण्यासाठी न्यायालयानेही दुचाकी चालकांना हेल्मेट सक्ती केली आहे. मात्र हेल्मेट सक्तीबाबत असलेल्या कारवाई किंवा मोहिमेत सातत्य नसल्याने चालकांमध्येही हेल्मेट वापराबाबत जनजागृती होत नसल्याचे दिसले. त्यामुळे हेल्मेट वापराबाबत अजूनही उदासिनता पहावयास मिळते.हेल्मेट खरेदीस होते गर्दी अकोट शहरात सलग तिसऱ्या दिवशी हेल्मेट सक्तीची कठोर अंमलबजावणी करण्यात आली होती. शहरात रस्त्याच्या कडेला काही विक्रेत्यांनी हेल्मेट विक्रीसाठी आणले होते. कारवाईचा फास टाळण्यासाठी नागरिकांची हेल्मेट खरेदीसाठी झुंबड पाहायला मिळाली होती.

# व्हॉटस ॲपवर हल्ला, कृषिमंत्र्यांचेही अकाऊंट हॅक!

## माणिकराव कोकाटे यांना बसला फटका

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अकोला-** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे व्हॉटस ॲप मंगळवारी सकाळी हॅक झाले. जगभरात अनेकांचे व्हॉटस ॲप असेच हॅक होत असून, यासाठी झीरो क्लिक टेक्निकचा वापर करण्यात आला असल्याचे मेटाने म्हटले आहे.

मंत्रालयात कॅबिनेट बैठकीसाठी कोकाटे उपस्थित होते. त्याच सुमारास हा प्रकार समोर आला. त्यांनी 'एक्स' या सोशल माध्यमावर पोस्ट करून त्यासंदर्भात माहिती दिली आहे. व्हॉटस ॲप हॅक करण्यात आले असून माझ्या व्हॉटस ॲप नंबरवरून येणाऱ्या कोणत्याही लिंकवर किंवा 'एपीके' ॲप क्लिक ओपन करू नये.



कृपया सावध राहा आणि अशा कोणत्याही संशयास्पद मेसेजला प्रतिसाद देऊ नका, असे कोकाटे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. या हल्ल्यासाठी पॅरेगॉन सर्विलांस सॉफ्टवेअरचा वापर केला असून ग्राफाईट असे त्याचे नाव आहे. या सायबर हल्ल्यात जवळपास ९० लोक जाळ्यात अडकल्याचे मेटाने सांगितले आहे. त्यात पत्रकार आणि अनेक मोठे व्यक्ती यांचा समावेश आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीने पाठवलेल्या चॅटवर, लिंकवर तसेच डॉक्युमेंट्सवर क्लिक करू नये, असे आवाहन केले जात आहे.२५० कोटी जी-मेल वापरकर्त्यांच्या खात्यांना हॅकिंगचा धोका आहे, असा इशारा गुगलने जारी केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून हॅकर्स खाती हॅक करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे गुगलने या इशाऱ्यात म्हटले आहे.

वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, हॅकर्स युजर्सना फोन करून तुमचे खाते हॅक झाल्याचे सांगतात. त्यानंतर ते रिकव्हरी कोड पाठवतात. हे कोड आणि ईमेल खरे असल्यासारखेच दिसतात. त्यामुळे वापरकर्ते सहज फसू शकतात. याद्वारे युजरच्या खात्याची सर्व गोपनीय माहिती हॅकर्स पळवू शकतात. चुकून रिकव्हरी कोडचा वापर केला, तर सेटिंगमधून पासवर्ड तत्काळ बदलण्याचे आवाहन गुगलने केले आहे.

# नवाई व शब्दमेळ प्रातिनिधिक कवितासंग्रहांचे थाटात प्रकाशन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती :** काव्यप्रेमी शिक्षक मंच जिल्हाशाखा-अमरावती, काव्यप्रेमी वऱ्हाडी मंच आणि शब्दलळा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वऱ्हाडी 'नवाई' व 'शब्दमेळ' या प्रातिनिधिक कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा थाटात संपन्न झाला.

स्थानिक बचत भवन सभागृहात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवयित्री ॲड. नीता कचवे यांनी केले.नामवंत वऱ्हाडी कवी खुशाल गुल्हाने यांनी अध्यक्षस्थान भूषविले.कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी (पुसद) आशिष बिजवल विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक विजय बिंदोड,आबासाहेब कडू, मंडल अधिकारी राजेश चौरपगार, ख्यातनाम कवयित्री डॉ.शोभा गायकवाड, सीमा भांदर्गे,कवी गणेश खडके,प्रमोद




भागवत यांनी मुख्य अतिथी म्हणून हजेरी लावली.प्रास्ताविकवर्षा भांदर्गे यांनी केले.उद्घाटन सोहळ्यास कवी आणि रसिक मोठ्या संख्येने हजर होते.भोजनावकाशानंतर 'वऱ्हाडी कवी संमेलन' सुरू झाले.यात प्रामुख्याने,रंजना कराळे, कैलास कापडे,संजीवनी काळे,किशोर जर्हाड,शुभांगी इंगोले,संजय देशमुख,छाया पाथरे,गजानन काकडे,शारदा गणोरकर,अजय अडीकणे, सुलभा गोगरकर,प्रमोद घाटोळ, शालिनी कावरे,लोमेश खैरकर, स्मिता बेलमारे,श्याम चौकडे,वर्षा पन्नासे,सुरेंद्र वाडेकर,शितल भोपाळे,यश इंगळे,सावित्री चंद्रापुरे,प्रकाश पाटील, मंजू वणवे,संजय धांडे,सविता पाटील आदि कवी,कवयित्रिंच्या कवितांना रसिकांनी उत्स्फुर्त दाद दिली. उद्घाटन सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन कवयित्री अर्चना गुल्हाने यांनी केले. ग्रामगीताचार्य छाया शहाणे व गझलकार विशाल कन्हेरकर यांच्या सूत्रसंचालनाने कवी संमेलन रंगतदार बनले.काव्यप्रेमी शिक्षक मंचाच्या अमरावती जिल्हाध्यक्षा अंजली वारकरी यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अक्षरशिल्प प्रकाशनचे संचालक विकास राऊत,सौ.ऊषाताई चौरपगार आणि शब्दलळा मंच सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.-

# अखेर भ्रष्टाचाराचा ठपका लागलेली इमारत होणार जमीनदोस्त

## प्रहार उप तालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांच्या उपोषणाला व सततच्या पाठपुराव्याला यश कापुसतळणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीकरता निधी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५कापूसतळणी**

ग्रामीण आरोग्याची जननी असलेल्या अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापुसतळणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा ठपका असलेल्या जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई व नवीन इमारत बांधकामासाठी मंजुरात द्यावी अशी मागणी प्रहार संघटना उपतालुकाप्रमुख तथा पक्षीमित्र अरुण शेवाणे यांनी सातत्याने लावून धरून त्यासाठी मागील काही दिवसापूर्वी अन्नत्याग उपोषण सुद्धा केले होते. जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि प आरोग्य अधिकारी व मुख्य कार्यकारी अभियंता जि. प. अमरावती यांनी सुद्धा या उपोषणाची व सततच्या निवेदनाची गंभीर दखल घेत शासनाकडे पत्र व्यवहार करून




नवीन इमारतीच्या बांधकामा करिता निधी मंजूर करून घेतला. आता कापुसतळणी इथे सुसज्ज असे प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत काही दिवसात तयार होईल अशी जि. प.कार्यकारी अभियंता श्री गायकवाड यांनी पक्षीमित्र अरुण शेवाणे यांना फोन करून माहिती दिली हे विशेष. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून कापुसतळणीचे नाव घेतल्या जाते आज त्याच प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधकाम साहित्य मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे केवळ १० वर्षातच इमारत शिकस्त झाल्याचा ठपका लागल्यामुळे परिणामी तेथील कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन सेवा द्यावी लागत आहे. त्याशिवाय रुग्णांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. या आरोग्य केंद्रावर जवळपास ५५ गावांचा डोलारा आहे. दररोज येथे रुग्ण उपचारासाठी दाखल होतात त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घटण्यापूर्वी शासनाने ही इमारत पाडून नव्याने इमारत बांधणीची मागणी कापुसतळणी येथील रुग्ण सेवक अरुण शेवाणे यांनी सातत्याने लावून धरली होती. त्याच अनुषंगाने कार्यकारी अभियंता श्री गायकवाड यांनी आरोग्य केंद्राला उपोषण दरम्यान भेट देऊन पाहणी सुद्धा केली होती. आणि त्यांनी त्या क्षणी आश्वासन सुद्धा दिले होते. नवीन वर्षात या इमारतीचे बांधकाम करू आणि त्या इमारतीच्या बांधकामा करिता मंजुरात देऊन त्यांनी आपले आश्वासन पूर्ण केले.

**भ्रष्टाचारी अधिकारी/ कर्मचारी यांच्या कारवाईचे काय?**

शाखा अभियंता ताराचंद्र पी. लुधीयाने , उपअभियंता एस.जी.वानखडे, तत्कालीन उपअभियंता निला वंजारी, कार्यकारी अभियंता पी. जी.भागवत, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्वेता बॅनर्जी यांना या निकृष्ट बांधकामासाठी जबाबदार धरून 'कारणे दाखवा' नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. पुढील कारवाई होत नसल्याने २ ऑक्टोंबरला आत्मदहनाचा इशारा उपोषण करते अरुण शेवाणे यांनी दिल्यानंतर पुन्हा सदर अधिकारी कर्मचारी यांना नोटीस देण्यास भाग पाडले होते. त्यानुसार सदर अधिकारी / कर्मचारी यांनी सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या कामासंबंधित दस्तऐवजाची मागणी केली असून संबंधित प्रकरणात विभागीय कार्यालयाकडून कार्यवाही सुरू असल्यामुळे २ ऑक्टोंबर २०२४ ला आपले आत्मदहन आंदोलन मागे घ्यावे असे कार्यकारी अभियंता गायकवाड यांनी प्रहार उपतालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. जोपर्यंत दोषी अधिकाधिक /कर्मचारी यांच्यावर आवश्यक कार्यवाही होत नाही तोपर्यंत लढा लढत राहील, कारण सरकारी इमारतीची निर्मिती व देखभाल याबाबी जनतेच्या पैशातून केल्या जात आहेत. दहा वर्षातच इमारत शिकस्त होते कशी ? यासाठी सतत पाठपुरावा सुरूच राहील. नवीन इमारत बांधकाम होणे ही नागरिकांसाठी आनंदाचीच बातमी आहे.उपोषण करते अरुण शेवाणे यांनी यावेळी सांगितले.

# रेवसा मार्गावर गजानन धाममध्ये चोरट्यांनी फोडली तब्बल पाच घरे

## गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बंद घरांना केले लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेवसा मार्गावर असलेल्या श्री गजानन धाममध्ये चोरट्यांनी उच्छाद मांडला. एकाचवेळी गजानन घाममधील तब्बल पाच घरांना लक्ष्य करून चोरट्यांनी ती फोडले आहेत. या चोऱ्या झाल्याचे सोमवारी समोर आले आहे. या प्रकरणी तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी सोमवारी ३ फेब्रुवारीला अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. यावेळी चोरट्यांनी -६७ ते ७० हजारांचा ऐवज लंपास केला आहे. सचिन वसंतराव जगताप (४१, रा. श्री गजानन धाम, रेक्सा रोड, अमरावती) असे तक्रारदारांचे नाव आहे, सचिन जगताप यांच्यासह याच ठिकाणी राहणारे दिपक ताथोड, विजय कथले, मुकेश खैरकर आणि उज्वल उवरे यांच्याही घरात चोरट्यांनी चोरी केली आहे. सचिन जगताप हे बाहेर गावी गेले होते. त्यामुळे त्यांचे घर बंद होते. याच संधीचा फायदा घेवून चोरट्यांनी त्यांच्या घराचा दरवाजा तोडून १७ हजारांची रोख लंपास केली, तसेच दीपक ताथोड यांच्या घरातून ४५ हजार रुपये रोख, पाच हजार रुपयांचे चांदीचे



व्कॉईन व पादुका असा एकूण ६७ ते ७० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला असल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. या पाचही चोऱ्या झाल्याचे सोमवारी उघड झाले आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

# महर्षी वाल्मिकी मठाच्या विकासासाठी निधी मंजुर करा

## म.कृ.समितीचे उमेश ढोणे यांनी घेतली पालकंत्र्यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

दर्यापूर तालुक्यातील सामदा काशीपूर येथील महर्षी वाल्मीकी मठाच्या विकासाकरिता माजी खासदार नवनीत राणा तसेच आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून शासनाकडुन विकास निधीतून काही रक्कम मिळाली आहे. या मठाच्या विकासाकरिता आणखी निदीची आवश्यकता असून महाग्रष्ट राज्य कृती समितीचे महासंचिव तसेच कोळी महादेव जमातीचे नेते उमेश ढोणे यांनी आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत २५ कोटी निधीची मागणी केली आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये श्री. ढोणे यांनी ही मागणी रेटून धरली. सामदा येथील श्री. सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान हजारो वर्षअतिप्राचीन असून त्याला ब तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त आहे. केवळ राज्यातूनच नव्हे तर देशातून हजारो भाविक या ठिकाणी भेट देत असतात, महादेव कोळी बांधवांचे हे



शक्तीपिठ, उर्जास्थळ हि आहेः या ठिकाणी जागा उपलब्ध असुन या संस्थान्च्या विकासारिता भरघोस निधी उपलब्ध करावा , अशी मागणी उमेश ढोणे यांनी यावेळी केली. या मठाचे आध्यात्मिक महत्व यावेळी त्यांनी पालकमंत्र्यांना पटवून सांगितले. ३० वे मठाधिपती वैकुंठवासी ऋषी घुसरककर महाराज यांचा शासनाने त्यावेळी गौरव करून व्यसन मुक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते . त्यानंतर आता ३१वे मठाधिपती ऋषी ज्ञानेश्र्वर महाराज भांडे हे मठाधिपती म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. या मठाला ऋषी मुनींची हजारो वर्षांची परंपरा आहे. मात्र शासनाकडून विकासनिधी मिळावा अशी मागमी सुद्दा उमेश ढोणे यांनी केली आहे. त्यावर पालकमंत्र्यांनी सकारातमक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले असून त्याबाबत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याना समन्वय करून तसा अहवाल शासनाला पाठविण्याचे निर्देश दिल्याची माहिती उमेश ढोणे यांनी दिली. वरील मागणी करतेवेळी युवा स्वाभिमान पार्टीचे नगराध्यक्ष योगिता राजेश कोलटेके, सभापती शंकर डोंगरे, नगरसेवक पुरुषोत्तम खरचान, भोपसे, व राजू चुंनकिकर, प्रकाश खरचांन, रुपेश कळसकर, जयंत देशमुख, गोपाळ सपकाळ, अर्चित पारखे, दीनेश इंगळे, व आदिवासी महादेव कोळी बांधव उपस्थित होते.


# नाटक, कविता आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी गाजला श्रीराम प्राथमिक शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा

## चिमुकल्यांच्या कलाविष्काराने पालक भारावले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५टाकरखेडा संभू**

अलीकडे चित्रपटांकडे वळणाऱ्या आजच्या पिढीला नाटकाचे महत्त्व कळावे या उद्देशाने सादर करण्यात आलेले नाटक, उत्कृष्ट कविता आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी श्रीराम प्राथमिक शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा गाजला ,येथील चिमुकल्यांनी कला कौशल्य सादर करत पालकांना मंत्रमुग्ध केले, शाळेचे उत्कृष्ट आयोजनाची गावात मात्र चांगली चर्चा सुरू आहे,

श्रीराम प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विविध सांस्कृतिक समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.श्रीराम प्राथमिक शाळेतील स्नेहसंमेलनामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये इंदुरीकर महाराजांची उत्कृष्ट भूमिका करणारा वीयूम मंगेश शेबे सर्वांचे आकर्षण ठरला .तसेच 'दिल की बात...... आपके साथ( न्याय अधिकार सभा युवा सुरक्षा मिशन)अंतर्गत एड. पृथ्वीसम्राट एम. दिपवंश व साहिल नवाडे (A. S. I. S.R.P.F.) अमरावती यांनी युवा वर्गाला व्यसनापासून दूर ठेवण्याकरिता,



एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हिंसाचार रोखण्याकरिता विविध मुद्द्यांच्या आधारावर मार्गदर्शन केले. तसेच मुख्य आकर्षण चला हवा येऊ द्या होऊ दे व्हायरल चे उपविजेते श्री प्रवीण तिखे यांची बासुंदी या वह्राडी कवितेने कार्यक्रमाची गोडी खूपच वाढवली .ज्योतिबाची सावली ..सावित्री माऊली हे दोन अंकी नाटक तेजांकुर बहुउद्देशीय संस्था प्रस्तुत निर्मिती ,दिग्दर्शक ,लेखक सौ अपूर्वा सोनार यांनीआई सावित्रीची भूमिका वटवली, तसेच जयकुमार चर्जन यांनी ज्योतिबा फुले यांच्या भूमिकेत व नाट्यदिग्दर्शक सतीश पवार यांनी सुद्धा नाटकांमध्ये आपली भूमिका साकारली एकूण २१ सहकारी अभिनेते यांनी अतिशय उत्कृष्ट असे नाटक सादर केले. टाकरखेडा संभू ग्रामवासी सर्व भावनिक होऊन ज्योतिबांचे नाटक त्यांनी अनुभवले, नाटकातील प्रसंग अगदी अंगावर काटा आणण्याजोगा होता. श्रीराम प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण पाटील, सहाय्यक शिक्षक अतुल खांदे, प्रमोद विघे ,प्रशांत देशमुख, रेखा खटाळे ,प्रतीक्षा बोंडे ,अश्विनी दिंडीलकर यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. नाटकाकरिता निलांबरीताई देशमुख अध्यक्ष श्रीराम शिक्षण संस्था टाकरखेडा संभू, गावातील सरपंचा रश्मी देशमुख, उपसरपंच प्रदीप शेंडे, पोर्णिमाताई सवाई जिजामाता कृषी भूषण पुरस्कार विभूषित, ग्रामपंचायत सदस्य सोनाली जामठे ,अविनाश पाटील ,प्रदीप देशमुख , दीपक पाटील, दिलीप वानखडे यांनी सुद्धा मोलाचे सहकार्य दिले.बॉक्स:- कहते है अगर किसी चीज को दिल से चाहो, तो सारी कायनात उसे तुमसे मिलने की कोशिश मे लग जाती हैअसाच प्रत्यय श्रीराम प्राथमिक शाळा टाकरखेडा शंभू शाळेतील शिक्षक श्री अतुल खांदे यांनी व्यक्त केला .आजच्या या रिलस च्या युगात तीन तासाचा चित्रपट सुद्धा न पाहणारी ही पिढी, त्यांना रंगमंच ,नाटक हे अगदी दुर्मिळत झाले आहे आजच्या या अल्फा पिढीला नाटक काय असतं .हे खरंच माहीत नाही .त्यांना नाटक ,अभिनेते, रंगमंच व्यासपीठ या सर्व संस्कृती शिकवण्यासाठी धडपडणारे व दरवर्षी शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्कृष्ट सूत्रसंचालनाने प्रेक्षकांचे मन जिंकणारे होतकरू श्रीराम प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री अतुल खांदेतसेच उत्कृष्ट नियोजनबद्ध कार्यक्रम ची रुपरेषा आखणारे मुख्याध्यापक श्री प्रवीण पाटील त्यांना तेवढ्याच उत्स्फूर्तपणे सर्व कार्यक्रम साथ देणारे त्यांचे सर्व शिक्षक वर्ग प्रमोद विघे ,प्रशांत देशमुख, रेखा खटाळे ,प्रतीक्षा बोन्डे,अश्विनी दिंडिलकर हे दरवर्षी श्रीराम प्राथमिक शाळेत तीन दिवसाचे स्नेहसंमेलन साजरे करतात त्यामध्ये विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकासाकरिता विविध स्पर्धा नृत्य नाटिका यांच्या आयोजन करतात. तसेच समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम ,आयोजित करतात. यावर्षी युवकांच्या समस्येवर प्रकाश टाकण्याकरिता एड. पृथ्वीवंश दीप सम्राट व साहिल नवाडे (ए.एस .आय. एस. आर. पी .एफ .अमरावती) तसेच चला हवा येऊ द्या फेम प्रवीण तिखे व ज्योतिबाची सावली..... सावित्री माऊली हे दोन अंकी नाटक आयोजित केले.त्यामध्ये अपूर्वा सोनार, जयकुमार चर्जन,सतीश पवार यांची प्रमुख भूमिका होती सर्वांनी कार्यक्रमाची उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांचे अभिनंदन केले

# जि.प.च्या ६६ गटासह १३२ गण निश्चितीवर निवडणुकांची तयारी

## जि.प.सह १४ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची मे महिन्यात शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

गत तीन वर्षांपासून रखडलेल्या जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांच्या निवडणुका मे महिन्यात लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तीन वर्षांपुर्वी आरक्षणासह निश्चित केलेले जिल्हा परिषदेचे ६६ सर्कल व १३२ पंचायत समितीच्या गणा प्रमाणे यंदा निवडणुकीची तयारी आयोगाकडून सुरू असल्याची चर्चा आहे.राज्यासह अमरावती जिल्हा परिषदेत तीन वर्षांपासून प्रशासक राज आहे. यासह १४ पैकी १९ पंचायत समित्यांची मुदत देखील त्याचवेळी संपल्याने तेथे प्रशासक बसविण्यात आले होते. परंतु तिवसा, नांदगाव आणि चांदूर रेल्वे या तीन पंचायत समित्यांची मुदत १३ डिसेंबर २०२४ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे या तीन पंचायत समित्या वगळता जिल्हा परिषदेच्या सर्कलसह अन्य पंचायत समित्यांमध्ये सन २०२२ मध्ये प्रभाग रचना आणि आरक्षण निश्चित करीत ते प्रसिध्द करण्यात आले होते. यावर आक्षेप स्विकारीत विभागीय आयुक्तांनी सुनावणी देखील घेतली आणि निर्णय पुर्ण करित अंतिम प्रभाग रचना आणि आरक्षण जाहीर करण्यापुर्वीच शासनाकडून या प्रक्रियेला स्थगिती मिळाली. त्यानंतर ओबिसी आरक्षण आणि



वाढविलेल्या सदस्या संख्येवर न्यायालयात सुनावणी सुरू होती. हीच स्थिती राज्यात देखील जेथे थे आहे. यावेळी जिल्ह्यातील तीन पंचायत समित्यांसह नागपूर, अकोल्यासह राज्यातील आठ जिल्हा परिषदा आणि पंचायत शकतात. २२ जानेवारीला उच्च समित्यांच्या निवडणूका एकत्र लागू न्यायालयात घेण्यात आलेल्या सुनावणी दरम्यान २५ फेब्रुवारीला अंतिम सुनावणी होणार आहे. त्यामुळे न्यायालयाने यावर निर्णय दिल्यास शासनाने आठ जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या आरक्षण, प्रभाग रचना आणि मतदान यादीचा कार्यक्रमचा देन महिन्यांत पुर्ण केला तर एकाचवेळी भंडारा आणि गोंदिया जिल्हा परिषद वगळता राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांमध्ये मे महिन्यांत निवडणुका लागण्याची शक्यता आहे. कारण अन्य जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये प्रभाग रचना आणि आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे आता येथे मतदान यादी आणि निवडणुक कार्यक्रम इतकाच ओबिसीच्या मुद्दयावर न्यायालयाने सोपस्कार शिल्लक आहे. आधीच २७ टक्के ऐकजी ५० टक्केच्या आता सर्व आरक्षण निश्चित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शासन आणि आयोगाच्या समन्वयाने निवडणुक मे महिन्यात निवडणुका लागण्याचे संकेत वर्तविले जात आहे.

**निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता?**

कारण मे महिन्यात जर निवडणुका लागल्या नाही तर या निवडणुकांना पावसाळ्याचा अडथळा निर्माण होईल. त्यानंतर ऑक्टोबरपर्यंत निवडणुका लांबेल. त्यामुळे मे महिन्यांत निवडणुका लावण्याची तयारी शासनाकडून सुरू असल्याची चर्चा आहे.

# तस्करांच्या टार्गेटवर ९ राज्यांतील वाघ
## वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरोचा अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**



देशात ९ राज्यांतील वाघांना तस्करांनी टार्गेट केल्याच्या पार्श्वभूमीवर वन्यजीव गुन्हे संस्थेने ३४ व्याघ्र प्रकल्पांना धोक्याचा इशारा जारी केला आहे. यात महाराष्ट्रातील सह्याद्री, ताडोबा आणि पेंच या व्याघ्र प्रकल्पातील वाघांचे अस्तित्व जीवानिशी आले आहे. तर ९ राज्यांत किमान १८०० वाघांचे अधिवास आहेत. वाघांना धोका निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली येथील वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरोचे सहसंचालक डॉ. मनोज कुमार यांनी १ फेब्रुवारी रोजी व्याघ्र प्रकल्प संचालकांना पत्र पाठवून अलर्ट केले आहे.गतवर्षी १३ देशांच्या व्याघ्र शिखर परिषदेत झालेल्या ठरावानुसार भारताने २०२२ पर्यंत वाघांची संख्या दुप्पट केली. सध्या भारतात साधारणत: ४००० वाघांचे अस्तित्व आहे. यामध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेशचा वाटा मोठा आहे. एकट्या भारतात वाघांचे ७३.७ टक्के अस्तित्व शाबूत आहे. मात्र भारतातील वाघांचे अस्तित्व आंतरराष्ट्रीय तस्करांनी संपवून टाकण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात वाघांना शिकाऱ्यांपासून वाचविण्यासाठी वनविभागाला परिश्रम घ्यावे लागेल, हे विशेष.

आंतरराष्ट्रीय स्तरावर वाघांचे अवयव आणि कातडीला लाखोंची बोली लागते. त्यामुळे तस्करांनी देशातील ९ व्याघ्र प्रकल्पांना टार्गेट केले आहे. यात महाराष्ट्रातील सह्याद्री, पेंच, ताडोबा, गडचिरोलीचा समावेश आहे.जिमकार्बेट गंगोत्री, राजाजी नॅशनल पार्क उत्तराखंड, अमनगढ, पिलीभित, वाल्मीकी नॅशनल पार्क उत्तर प्रदेश, बालाघाट, पेंच, मध्य प्रदेश, वेस्टर्न घाट म्हणजे गोवा, तमिळनाडू, कर्नाटक, गुजरात, केरळ अशा ९ राज्यांतील व्याघ्र प्रकल्पात सुमारे १८०० वाघांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. महाराष्ट्र व मध्य प्रदेशात १००० वाघ सध्या आहेत. उर्वरित वाघ ७ राज्यात आहेत.गेल्या १९ वर्षांत वाघांची संख्या ४००० हजारांच्यावर पोहोचलेली आहे. भारतात वाघांची संख्या वाढतच आहे. सन २०२६ ची आकडेवारी एका वर्षाने समोर येईल.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने इच्छूकांमध्ये अस्वस्थता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणावरून याचिका प्रलंबित असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकेच्या निवडणुका होत नसल्याने नागरिकांना कोणत्या समस्यांचा सामना करावा लागत आहे, यावर आवाज उठवायला लोकप्रतिनिधीच नाहीत. निवडणुका लांबल्याने इच्छूकांमध्ये अस्वस्थता वाढीस लागली आहे.

अमरावती महापालिकेवर ८ मार्च २०२२ पासून प्रशासक आहे. आयुक्त हे प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. निवडणुका कधी होणार आणि आपला नगरसेवक कोण असेल, हा प्रश्न आता नागरिकांनाही पडू लागला आहे. समस्या मांडण्यासाठी माजी नगरसेवकांकडे नागरिक गेले, तर आमच्याकडे सत्तेची ताकदच नाही, तर आम्ही काय करायचे, असे उत्तर नगरसेवक देतात. त्यामुळे नागरिक हतबल झाले आहेत. महापालिकेला सुद्धा लोकप्रतिनिधी नसल्याने लोकांपर्यंत, त्यांच्या घरापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या सोडविण्यात अडचणी येत आहेत.प्रशासकराज सुरू असलेल्या जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपंचायत व पंचायत समितीमधील ओबीसी आरक्षणाची सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली. या आरक्षणासंदर्भातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आता २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सुनावणी होईल. प्रामुख्याने महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने, याबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात झाल्यानंतर निवडणुकीची तयारी करण्यासाठी किमान तीन महिन्यांचा वेळ लागेल. त्यामुळे तूर्तास लगेच महानगरपालिकांसह नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुका होण्याची शक्यता नाही

विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयानंतर लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लागेल, म्हणून इच्छुक उमेदवारांनी आपापल्या प्रभागात तसेच जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या गणात मतदारांच्या गाठीभेटी वाढविल्या. जनसंपर्क कार्यक्रमांचेही नियोजन केले होते. पण, आता इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.

# अचलपूर पोलीस स्टेशन अंतर्गत अल्पवयीन विद्यार्थिनीची छेडछाड करून धमकी देणारा आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**

अल्पवयीन विद्यार्थिनीचा तीन दिवसांपासून पाठलाग करून तिला धमकावणाऱ्या युवकाला अचलपूर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीचे नाव सूरज संतोष मालटे (वय २३, रा. बेगमपुरा, अचलपूर) असे आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मागील तीन दिवसांपासून विद्यार्थिनीचा पाठलाग करत होता. ४ फेब्रुवारी रोजी शाळा सुटल्यावर त्याने शाळेच्या गेटसमोर एमएच २७, डीसी ४८०५ क्रमांकाची दुचाकी उभी केली आणि विद्यार्थिनीला माझ्यासोबत चल असे म्हणत तिची छेड काढली.विद्यार्थिनीने विरोध केल्यावर आरोपीने तुझ्या कुटुंबाला पाहून घेईल अशी धमकी दिली आणि तेथून निघून गेला.या घटनेमुळे घाबरलेल्या विद्यार्थिनीने घरी जाऊन वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर तिने वडिलांसह अचलपूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

**पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल, आरोपी अटकेत**

विद्यार्थिनीच्या तक्रारीनंतर अचलपूर पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला तात्काळ अटक केली.पोलिसांनी आरोपीची दुचाकी जप्त केली असून, पुढील तपास ठाणेदार मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.पोलिसांनी नागरिकांना अशा प्रकारच्या घटना घडल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# दुकान परवाना अनिवार्य, अन्यथा होणार कारवाई? अन्न व औषधी विभागाच्या व्यावसायिकांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत सर्व अन्न व्यावसायिकांना परवाना व नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. परवाना न घेणाऱ्यांवर अन्न व औषधी प्रशासनाच्या वतीने कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. यात किरकोळ व्यावसायिकांसह स्वस्त धान्य दुकानदारांचाही समावेश असल्याने कारवाईची टांगती तलवार आहे.जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत दहा हजाराच्या वर सक्रिय परवाना व नोंदणी धारक अन्न व्यावसायिक आहेत. काही अन्न व्यावसायिकांनी मुदतपूर्व परवान्याचे नूतनीकरण केले नसल्याने अनेक परवानाधारक सक्रिय नसल्याचेही दिसून येते.सक्रिय परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्र न घेता व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते.शहरी भागाच्या तुलनेमध्ये ग्रामीण भागामध्ये काही व्यावसायिक परवाना न घेताच अन्नपदार्थांची विक्री करतात. त्यामुळे शासनाने ग्रामीण भागाकडेही अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. तर काही व्यावसायिक एकाच परवान्यावर वेगवेगळ्या ठिकाणी अन्नपदार्थ विकत असल्याचेही दिसून येते.

**येथे करा ऑनलाइन नोंदणी**

परवाना किंवा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी foscos.fasal.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.अन्न व्यावसायिकांनी व्यवसायासाठी त्वरित ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करून परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे.

**यांना प्रमाणपत्र नोंदणी केली आहे बंधनकारक**

पाणीपुरी, भेलपुरी, पावभाजी विक्रेते, आइस्क्रीम, बर्फ गोळा, ज्यूस, सरबत विक्रेते, भाजीपाला व फळ विक्रेते, किरकोळ किराणा, डेली नीडस, बेकरी, घाऊक विक्री करणारे वितरक व वाहतूकदार, गृह उद्योग ते अन्न पदार्थांचे उत्पादक, उपाहारगृह, हॉटेल, खानावळ, चहा विक्रेते, दूध विक्रेते, स्वस्त धान्य दुकानदार, केटरर्स, शालेय पोषण आहार पुरवठादार, बचत गट, शासकीय, अशासकीय कार्यालयातील कँटीन, वसतिगृहातील खानावळ, धार्मिकठिकाणी वितरित होणारा प्रसाद, मेळावे व प्रदर्शनांमधील अन्न पदार्थांचे स्टॉलधारक इत्यादी व्यावसायिक या वर्गवारीच्या कक्षेत येतात.

# जी बी एस आजाराची मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी घेतली जेम्बो बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शन सूचनांच्या अनुषंगाने गुलेन बॅरी आजाराबाबत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षते खाली महानगरपालिकेत जेम्बो बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी पशू विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा प्रयोग शाळा, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य विभाग व खाजगी रुग्णालय यांना निर्देश दिले की, कोणताही रुग्ण हा जी बी एस आजाराच्या लक्षण दिसत असेल तर तात्काळ सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याशी संपर्क साधावा तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सुद्धा आपल्या आरोग्य केंद्रात अतिसार, हाता पायात मुंग्या येणे, बधीर होणे असे लक्षण आढळल्यास आपल्या नजीकच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा असे सांगितले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे यांनी सुध्दा जी बी एस आजार संदर्भात शहरात कुठेही लक्षण दिसून आल्यास साथ रोग कक्ष्याची संपर्क करावा असे कळविले जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .दिलीप सोंदले यांनी सांगितले की, जिल्यात निदान झालेले अजून रुग्ण नसून उपाय योजना जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सुख सोयींनी उपलब्ध करून दिली आहे अशी माहिती दिली. डॉ.किशोर इंगोले अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी सुध्दा घाबरण्याचे कारण नसल्याचे सांगितले. डॉ.रुपेश खडसे यांनी ह्या जेम्बो बैठकीचे आयोजन करून जनजागृती व्हावी व जनतेमध्ये निराशेचे वातावरण होऊ नये व सर्व विभाग जिबीएस आजारासाठी लडण्यास तयार आहे ह्या उद्देशाने आढावा चर्चा घेण्यात आली. ह्या महत्वाच्या बैठकीत डॉ.संदीप पाटबागे डॉक्टर इन्चार्ज यांनी सर्व वैद्यकीय अधिकारी यांना रुग्णाची काटेकोर तपासणी करावी असे निर्देश दिलेत. पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे यांनी पशू व पोल्ट्री फॉर्म मधून हा आजार होत नसून अश्या स्पष्ट मार्गदर्शन सूचना पशू विभागाकडून आल्या नसल्याचे सांगितले. ह्या महत्वाच्या जेम्बो बैठकीत शहराची रॅपिड टीम तयार करण्यात आली ह्यामध्ये बालरोग तज्ञ, न्यूरोलोगिष्ट, फिजीशियन, माणसं तज्ञ, वैद्यकीय महाविद्यालय चे वैद्यकिय अधिकारी, प्रयोग शाळा तज्ञ, साथ रोग नियंत्रण अधिकारी, अन्न व औषध यांचे अधिकारी अशी टीम बनवण्यात आली. ह्या बैठकीत डॉ.स्वाती कोवे, डॉ.पौर्णिमा उघडे, डॉ.निगार खान, डॉ.मानसी मुरके, डॉ.आकिब खान, डॉ.अजय जाधव, देवेंद्र बायकर, डॉ.वैशाली कावरे व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तसेच महात्मा फुले जन आरोग्य चे अंकिता मतले यांनी जी बी एस चे उपचार साठी पॅकेज असल्याचे सांगितले व सर्व शहरातील यंत्रणा सज्ज असल्याचे सांगितले असे सर्व तज्ञ व रॅपिड टीम चे माध्यमातून येकल्याने मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आनंद व्यक्त केला.

# आजारावरील उपचारांसाठी झटपट मिळणार मदत : मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष जिल्ह्यात होणार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

मागील काही वर्षापासून राज्यात मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष सुरू आहे. या कक्षाच्या माध्यमातून राज्यातील गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत पुरवली जाते. दरम्यान, आता महागड्या वैद्यकीय उपचारासाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णाला आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पेपरलेस करण्यात येणार आहे. या प्रक्रियेसाठी मंत्रालयात जाण्याची आवश्यकता आता राहणार नसून जिल्हाधिकारी कार्यालयातच हा कक्ष सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णाची आणि त्यांच्या नातेवाइकांची होणारी फरफट आता थांबणार आहे.

मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाकडून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना



संबंधित रुग्णालयामार्फत आर्थिक साहाय्य देण्यात येते. जिल्ह्यातील रुग्णांना मंत्रालयात जाण्याऐवजी आता जिल्ह्यातच जिल्हाधिकारी कार्यालयात झटपट मदत मिळणार आहे. ही प्रक्रिया ऑनलाइनही करता येणार असल्यामुळे पेपरलेस कारभार होणार आहे.

एक लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न आवश्यक, शस्त्रक्रिया, प्रत्यारोपण, कॅन्सर या साऱ्या आजारांवरील उपचारांसाठी मदतमुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीतून मिळते. यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मात्र सध्यतरी अमरावती मध्ये हा कक्ष कार्यान्वित झाला नाही आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात विचारणा केली असता पूरेशी माहिती मिळू शकली नाही.

# दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांना झाली सुरूवात
## जिल्ह्यातून यंदा दहावीला ३८ हजार ९८५ विद्यार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

दहावीच्या विज्ञान विषयाच्या – प्रात्यक्षिक परीक्षा सोमवारपासून ढ सुरू झाल्या. ही परीक्षा २० फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. त्यानंतर २१ फेब्रुवारीपासून लेखी – परीक्षा सुरू होणार आहे.

राज्य माध्यमिक व उच्च – माध्यमिक शिक्षण मंडळाकडून – दहावीच्या परीक्षेसाठी तयारी पूर्ण झाली आहे. दहावी-बारावीची परीक्षा कॉपी मुक्त व्हावी, यासाठी – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च – माध्यमिक शिक्षण मंडळाकडून विविध उपाय योजना केल्या जात आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे – प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. सर्व शाळांमध्येप्रात्यक्षिक परीक्षांना प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मराठी व हिंदी भाषांची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. जिल्ह्यातून सुमारे ३८ हजार ९८५ विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक परीक्षा देण्यास सुरूवात केल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. प्रात्याक्षिक परीक्षा संबंधित शाळेतच होणार आहेत. त्यासाठी पर्यवेक्षक बाहेरून येणार आहेत.

# 'ईव्ही'चा स्पीड वाढवताय, जपूनच; बेकायदा बदल करण्याचे प्रमाण वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

दिवसेंदिवस पेट्रोल- डिझेलच्या किमती वाढत आहेत. अशातच अनेकजणांनी बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांच्या (ईव्ही) मागणीत वाढ केली आहे. मात्र, अचानक स्पीड वाढवला की ही वाहने पेट घेतल्याच्या घटना काही जिल्ह्यांमध्ये उघडकीस आलेल्या आहेत.

सध्या उन्हाळा सुरू झाला असून 'ईव्ही'चा अचानक वेग वाढविला की तो जीवघेणा ठरू शकतो. तर काहींनी कंपनीच्या 'ईव्ही' गाड्यांमध्ये परस्पर बदल करून वेग वाढविण्याची शक्कल लढविली आहे. अशाप्रकारे 'ईव्ही' वाहनांमध्ये बदल केल्याचे पोलिस, आरटीओच्या लक्षात आल्यास वाहनचालकांना दंड आणि कारवाई देखील होऊ शकते, अशी नियमावली आहे. विविध कंपन्यांच्या 'ईव्ही' दुचाकी विक्रीसाठी उपलब्ध आहेत; मात्र याईव्ही'मध्ये वेग मर्यादा वाढविण्यासाठी त्यात बदल करतात; परंतु हा नियमबाह्य प्रकार वाहनचालकांना आर्थिक झळ पोहोचविणारा ठरेल. मुळात वाहनात बेकायदेशीर बदल करता येत नाही, यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी



थेट कारवाई करू शकतात. ईव्ही जळाल्याची एकही घटना जिल्ह्यात घडलेली नसली तरी वाहनधारकांनी सतर्कता गरजेची आहे.

**पॉवर वाढवाल तर वाहनाचा होईल कोळसा !**

ईव्ही वाहन किती सीसी आहे, याबाबतची नोंदणी वाहन खरेदीवर आरटीओ कार्यालयातून केली जाते. खरे तर डिस्चार्ज बॅटरी ओव्हरचार्ज केल्यास ते देखील धोकादायक ठरते. ओव्हरचार्ज बॅटरी केल्यास ती फुटण्याची जास्त भीती असते.

**बॅटरीची क्षमता तपासूनच चार्जिंग करणे गरजेचे**

ईव्ही वाहनांमुळे ध्वनी, वायू प्रदूषण होत नाही. परंतु बॅटरी डिस्चार्ज झाली तर ती चार्जिंग करावी लागते. बॅटरीच्या क्षमतेवरून ती किती वेळात चार्ज होईल, हे तपासून घ्यावे.

**काय काळजी घ्यावी?**

ईव्ही चार्ज करण्यासाठी स्वतंत्र कनेक्शन दिलेले असते. बॅटरी ओव्हरचार्ज होणार नाही, तसेच स्कॉकिट, चार्जिंग पिन, कॉड चेक करणे गरजेचे आहे. घरातील इतर उपकरणांवर ईव्ही चार्ज करू नये.

**'ईव्ही' मॉडिफॉय कराल तर होणार कारवाई**

परवानगी शुल्क भरून तसे वाहनात बदल करता येतात; परवानगीविना बदल झाल्यास आरटीओ कारवाई करू शकतात. वाहन कोणतेही असो यात बदल करायचे असल्यास आरटीओकडे तक्रार करावी.